हॅलो प्रभात
# अहिल्यानगर
जिल्हा विशेष मंगळवार, दि. २३ डिसेंबर २०२५





## थोडक्यात पण महत्वाचे



### मित्रपक्षांना चर्चेत गुंतवत स्वबळाचाच डाव टाकण्याची भाजपाची खेळी?

**नाशिक : हॅलो प्रभात**

महापालिकेच्या जागावाटपासाठी महायुतीतील तिन्ही पक्षांच्या शहराध्यक्षांची बैठक होऊनही संपूर्ण चर्चा जागा वाटपाच्या आकड्यांवर अडकली आहे. शिंदेसेना ४०-४५ जागा तर राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून ३०-३५ जागांची मागणी करण्यात आल्याने चर्चेची गाडी पुढेच सरकू शकलेली नाही असं समजते. मंत्री गिरीश महाजन यांचं रात्री उशिरापर्यंत प्रमुख नेत्यांसोबत खलबते सुरू होती. पक्ष नेत्यांच्या भेटीनंतर स्थानिक पातळीवरील कोअर कमिटीच्या बैठकादेखील घेण्यास सांगितले होते. मात्र महायुतीतील घटक पक्षांना चर्चेचे गुन्हाळ सुरू ठेवत काँग्रेस, राष्ट्रवादीतील दिग्गज विरोधकांनाही स्वत:कडे खेचण्याचा प्रयत्न भाजपाचा आहे. त्यामुळे शत्रूंनाच नव्हे तर मित्रांनादेखील गाफील ठेवण्याची अनोखी रणनीती आखून भाजपाकडून स्वबळाची खेळी खेळली जाणार असल्याचीही चर्चा सुरू आहे. भाजपाचे निवडणूक प्रभारी असलेले मंत्री गिरीश महाजन हे नाशिक महापालिकेत युती करण्याचे निर्देश असल्याचे सांगत युतीची बोलणी करत आहेत. मात्र भाजपा शहराध्यक्ष सुनील केदार हे भाजपा स्वबळावर निवडणूक लढवणार असल्याची घोषणा जाहीरपणे करतात. निवडणूक प्रमुख म्हणून नुकतीच निवड झालेल्या आमदार देवयानी फरांदे यादेखील सर्वच जागांवर कमळच फुलवणार म्हणत एकप्रकारे स्वबळाचेच संकेत देत आहेत. महाजनांकडून युतीबाबत सकारात्मक चर्चा सुरू केल्यानंतर तसेच मित्रपक्षांशी एकीकडे बैठकांचे सत्र, युतीसाठी बोलणी सुरू असताना भाजपाचे २ प्रमुख पदाधिकारी स्वबळाच्या घोषणा करत असल्याने भाजपाच्या इच्छुकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

### ८० लाखांची व्हेल माशाची उलटी जप्त; गुजरातच्या तरुणाला अटक

**मुंबई : हॅलो प्रभात**

दहशतवाद विरोधी पथक (एटीएस) आणि वन विभागाने संयुक्त कारवाईत ८० लाख रुपयांची व्हेल माशाची उलटी कुर्ला पश्चिम परिसरातून जप्त केली. गुजरातहून मुंबईत या उलटीचा विक्रीसाठी आलेल्या तरुणाला अटक करण्यात आली आहे. वन विभागाचे कर्मचारी महेंद्र गिते हे शनिवारी रात्री उशिराने गस्त घालत असताना वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष डगळे यांच्या आदेशानुसार कुर्ला येथे मदतीसाठी दाखल झाले. कुर्ला पोलिस ठाण्याचे ‘एटीएस’चे पोलिस उपनिरीक्षक श्रीराम घोलप यांनी एका संशयित व्यक्तीकडे व्हेल माशाची उलटीसदृश पदार्थ आढळल्याची माहिती दिली होती. घटनास्थळी पोहोचल्यानंतर पोलिसांच्या ताब्यात असलेल्या तरुणाचे नाव विष्णूभाई राजूभाई मकवाना (२८) असून, तो गुजरातच्या अहमदाबादचा रहिवासी असल्याचे स्पष्ट झाले. त्याच्याकडून व्हेल माशाची ६२७ ग्रॅम वजनाची उलटी जप्त करण्यात आली आहे. बाजारभावानुसार त्याची अंदाजे किंमत ८० लाख रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. यापैकी २७ ग्रॅम नमुना रासायनिक तपासणीसाठी राखून उर्वरित ६०१ ग्रॅम पदार्थ सीलबंद करण्यात आला.

### २७ वर्षांची सेनेची सत्ता गेली, भगूरमध्ये अजित पवार गटाचा मोठा विजय

**नाशिक : हॅलो प्रभात**

राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या एकूण २८८ सदस्यपदासाठी आणि थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता मतदान झाले. आता २१ डिसेंबर २०२५ रोजी निकाल आहे. या सर्व निवडणुकीत पुन्हा एकदा महायुतीचे वर्चस्व पाहायला मिळत आहे. यातच नाशिकमधील भगूर नगर परिषद निवडणुकीत मोठा उलटफेर पाहायला मिळाला. तब्बल २७ वर्षांची शिवसेनेची सत्ता संपुष्टात आली असून, अजित पवारांच्याराष्ट्रवादी काँग्रेसने मोठा विजय मिळवला आहे. नाशिकचे भगूर म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे गाव म्हणून परिचित आहे. या ठिकाणी करंजकर आणि बलकवडे अशी परंपरागत राजकीय लढाई होती. गेले २७ वर्षे या गावात विजय करंजकर आणि शिवसेनेची सत्ता होती. गेल्या लोकसभा निवडणुकीत तिकीट नाकारल्याने करंजकर उद्धव ठाकरेंना सोडून शिवसेना शिंदे गटात गेले. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन गट पडले आणि प्रेरणा बलकवडे या अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेल्या. देवळाली मतदार संघात हे गाव येते. पण हा मतदारसंघ राखीव असल्याने प्रेरणा बलकवडे यांना आमदारकी लढता आली नाही. त्यामुळे नगर परिषदेत करंजकर आणि बलकवडे यांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केली.

### आजपासून अर्ज भरण्यास सुरुवात, थंडीत राजकीय वातावरण तापणार

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

गळ्यात स्कार्प, हातात विकासकामांचे परिचय पत्र, कुठे फटाका फोडलेल्या, हालगीचा दणदणाट, हात जोडून मतदारांचे आशीर्वाद मागणारे उमेदवार आणि त्यांच्या मागून चालणारे पंचवीस - पन्नास कार्यकर्त्यांचा समूह अशा वातावरणात रविवारी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराने वातावरण ढवळून गेले. त्यामुळे प्रत्येक प्रभागात, प्रत्येक गल्लीबोळात उमेदवारी व कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. कोल्हापूर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक १५ जानेवारी रोजी होत असून नामनिर्देशनत्रे भरण्यास उद्या, मंगळवारपासून सुरुवात होत आहे. परंतु, निवडणूक लढवायची याचा पक्का निर्धार केलेल्या उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रे भरेपर्यंत वाट न पाहता प्रत्यक्ष प्रचाराला सुरुवात केली आहे. त्यातही शनिवार, रविवार दोन दिवस सुट्टीचे असल्याने मतदार घरी भेटतील या अपेक्षेने अनेक उमेदवारांनी मोठ्या पदयात्रा काढल्या. विविध राजकीय पक्षांचे स्कार्प गळ्यात अडकवून हालगीच्या दणक्यात उमेदवार व त्यांचे समर्थक कार्यकर्ते उमेदवारांची ओळख करून देणारी पत्रके घरोघरी वाटली जाऊ लागली आहेत. पदयात्रेच्या माध्यमातून मतदारांना भेटण्यावर उमेदवारांनी जोर दिला आहे.

# टेंभुर्णीत डॉ. अमित पावले परिवाराचा गौरव

**टेंभुर्णी : हॅलो प्रभात**

दीपक देशपांडे

अमेरिकेतील सेंट लुईस येथील सी.जे.बी. हॉस्पिटलमध्ये बबनदादा शिंदे यांच्यावर यशस्वी हृदय प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करणारे प्रख्यात हृदयरोग तज्ञ व टेंभुर्णीचे सुपुत्र डॉ. अमित पावले यांचा व त्यांच्या परिवाराचा सन्मान टेंभुर्णीत संपन्न झाला. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय टेंभुर्णी शाखा व विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना, पिंपळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने येथील पुष्पक मंगल कार्यालयात हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या वेळी जिल्हा सहकारी दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे बोलत होते. अमेरिकेत उपचाराच्या संपूर्ण कालावधीत पावले परिवाराने



## हृदय प्रत्यारोपण यशस्वी करणाऱ्या सेवेला मानाचा मुजरा

शिंदे कुटुंबाची मनापासून काळजी घेतली. डॉ. अमित पावले यांच्यासह त्यांच्या पत्नी युगंधरा पावले व मुलगा विहान पावले यांचे सहकार्य अमूल्य असून हे ऋण कधीही विसरता येणार नाही, असे रणजितसिंह शिंदे यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर उपक्षेत्र संचालिका सोमप्रभा बहन होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून राजयोगिनी ब्रह्माकुमारी उषादिदी, माजी आमदार विनायकराव पाटील, माजी आमदार संजयमामा शिंदे, विक्रमसिंह शिंदे, प्रणिता शिंदे, कृष्णा शिंदे, आर्या शिंदे यांच्यासह डॉ. यादव, डॉ. व्होरा, डॉ. कानेटकर, डॉ. ए. एस. पावले, हेमलता पावले आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रवचन करताना राजयोगिनी उषादिदी म्हणाल्या, “श्रेष्ठ कर्म आणि दानशील वृत्ती असलेल्या व्यक्तींची ओळख समाजात कायम राहते. परोपकारातूनच खरे परिवर्तन घडते.” याप्रसंगी शिंदे कुटुंबीयांच्या वतीने पावले परिवाराचा तसेच राजयोगिनी उषादिदी यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. डॉ.अमित पावले हे अल्पकालीन भारत दौऱ्यावर आले असतानाच अमेरिकेतील हॉस्पिटलमधून तातडीचा संदेश मिळाल्याने त्यांनी त्वरित परतीचा निर्णय घेतला. जाताना सर्वांचे आभार मानून, बबनदादा शिंदे भारतात येतील तेव्हा स्वतः त्यांच्यासोबत येऊन पुन्हा भेट देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. त्यांच्या वतीने विहान पावले यांनी सुसंवाद्य शब्दांत कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बीके अनुप करवा बहनजी व राजेंद्र जाधव यांनी केले. माढा तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, सरपंच, महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## बसवंत चित्रकला स्पर्धा संपन्न

**राहुरी : हॅलो प्रभात**

बसवंत मधमाशी उद्यान बसवंत -मुखेड रोड, पिंपळगाव बसवंत (जि. नाशिक) या ठिकाणी स्पर्धेतील स्पर्धक तसेच मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण समारंभ अतिशय उत्साहाने पार पडला. सावित्रीबाई फुले इंग्लिश मीडियम स्कूल, म.फु.कृ.वि.राहुरी, शाळेची इयत्ता सातवी मध्ये शिकणारीआयेशा अस्लम मुलाणी हिस उत्तेजनार्थ पारितोषिक अंकुश शिंदे (IPS) पोलीस आयुक्त पुणे, यांचे हस्ते व नाशिकचे खा.भास्कर भगरे, आदिनाथ चव्हाण, संपादक ॲग्रोवन पुणे, डॉ.बी.बी.पवार, संजय बी.पवार, संस्थापक बसवंत मधमाशी उद्यान प्रकल्प यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्रक व रु.१०००/-अशा स्वरूपाचे पारितोषिक देण्यात आले. या यशाबद्दल संस्थेचे सचिव डॉ.महानंद माने साहेब, खजिनदार महेश घाडगे व सर्व संचालक मंडळ सदस्य, सावित्रीबाई फुले इंग्लिश मिडीयम स्कूल शाळेच्या प्राचार्या सौ.योगिता आठरे,बसवंत गार्डन हनी बी फेस्टिवल राज्यस्तरीय चित्रकला परीक्षा समन्वयक राजेंद्र भालेकर, शाळेचे कलाशिक्षक हरेश्वर साळवे व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सर्व पालक वर्ग व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे.




## बीबीएन ग्लोबलतर्फे व्यवसाय संवाद बैठक

**संभाजीनगर : हॅलो प्रभात**

बीबीएन ग्लोबलतर्फे संभाजीनगर येथे उद्योजकांसाठी व्यवसाय संवाद बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी दुबई येथे ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या ‘महाबीझ २०२६’ या आंतरराष्ट्रीय व्यवसाय

### ‘महाबीझ २०२६’ची माहिती

परिषदेची माहिती देण्यात आली. जीएमबीएफ ग्लोबलच्या सदस्या प्रचिती तलाठी यांनी महाराष्ट्र व मराठवाड्यातील उद्योजकांना निर्यात-आयात, गुंतवणूक, आंतरराष्ट्रीय भागीदारी व जागतिक नेटवर्किंगच्या संधी या परिषदेमुळे उपलब्ध होणार असल्याचे सांगितले. गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरमचे सदस्य दिलीप खेडेकर यांनी अशा संवादात्मक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. महाबीझ २०२६ ही दुबईत होणारी द्वैवार्षिक जागतिक परिषद असून पंधराहून अधिक देशांतील ८०० ते १००० उद्योजक, गुंतवणूकदार, निर्यातदार, स्टार्टअप्स व उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.

# डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत श्रेयश भवर प्रथम

## आत्मा मालिक राज्यात अव्वल

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

मुंबई विज्ञान अध्यापक मंडळ आयोजित डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत आत्मा मालिक सेमी इंग्लिश मिडीयम गुरुकुलाच्या ४६ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळविले. परीक्षा इयत्ता ६ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली जाते. संपूर्ण महाराष्ट्रातून मराठी माध्यमामध्ये श्रेयश भवर हयाने प्रथम क्रमांक मिळविला आहे. सलग दहाव्या वर्षी आत्मा मालिकचे राज्यात सर्वाधिक विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकले असून विद्यार्थी व शिक्षक यांच्या अथक परीश्रमातून हे यश मिळाले. आजपर्यंत या परीक्षेत २९५ विद्यार्थी गुणवत्ता यादीत येण्याचा नवा ऐतिहासिक विक्रम गुरुकुलाने केला आहे असे प्राचार्य निरंजन डांगे यांनी सांगीतले यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये इ. ६ वी चे अथर्व



कोळपे, राजवीर कालेकर, कार्तिक शेटे, भूपती चव्हाण, स्वरा चौधरी, श्रेयश कासार, योगराज पवार, आराध्य बोऱ्हाडे, यशराज बराते तसेच इ. ९ वी चे श्रेयश भवर, कृष्णा नेहे, कृष्णा लोखंडे, श्रेयश नलावडे, आरव नाणेकर, धनश पाटील, श्रीतेज इंगोले, श्लोक कदम, आयुष नवले, पृथ्वीराज टोपे, हर्षवर्धन खिंडकर, राम जाधव, चैतन्य मखमले, विश्वजीत त्र्यंबके, मयंक नाहिरे, अंकित पाटील, यश कनके, तनुष्का कोर्डे, कृष्णा किसे, आदित्य मोकाटे, सोहम मकाळ, दर्शन गिरासे देवयानी वारंगुळे, ओम कदम, आदित्य भगत, ज्ञानेश्वरी काळे, प्रणव केदार, ओम पांगरे, यश निमसे, पृथ्वीराज मोरे, अथर्व नागवडे, विज्ञानी कुंभार, वेदांत काकडे, दर्शन ओव्हाळ, पार्थ मोरे, साईश मोरे, पार्थ काळे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

या विद्यार्थ्यांना प्राचार्य निरंजन डांगे, विभाग प्रमुख अनिल सोनवणे, बाळकृष्ण दौंड, सचिन डांगे, पर्यवेक्षक नयना शेटे, गणेश रासने, विषय शिक्षक सोपान शेळके, अमोल कर्डिले, अकांक्षा कळसकर, रिना पवार, अंजली तिवारी अर्थव फाऊंडेशन चे नंदकिशोर भाटे, राहुल मिश्रा, शिव्म तिवारी, प्रियान्यु कुमार, हरिष तेली, संदिप कुमार, अनुष्का कुमारी, गौरव कापडणीस, अभिलाषा उन्हाळे यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# महिला सबलीकरणासाठी किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन




**राहुरी : हॅलो प्रभात**

सात्रळ येथील लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या महिला सबलीकरण कक्षांतर्गत किशोरवयीन मुलींसाठी महिला आरोग्य, शारीरिक-मानसिक बदल व सुरक्षितता याविषयी मार्गदर्शनपर उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांत आनंद गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूल सात्रळ, श्री छत्रपती शिवाजी विद्यालय पाथरे बुद्रुक व श्रीमती कोंडाबाई नानासाहेब कडू पाटील कन्या विद्यालय सात्रळ या तीन विद्यालयांतील विद्यार्थिनींना व्याख्यान व प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले. उपप्राचार्य डॉ. जयश्री सिनगर, महिला सबलीकरण कक्षाच्या समन्वयक प्रा. सोनाली मुन्तोडे तसेच प्रा. प्रियंका गागरे व प्रा. प्रियंका तांबे यांनी मार्गदर्शन केले. प्रभारी प्राचार्य डॉ. सोपान शिंगोटे यांचेही मार्गदर्शन लाभले. तिन्ही विद्यालयांच्या मुख्याध्यापकांनी उपक्रमास सकारात्मक प्रतिसाद दिला.

# भंडारदरा धरण जागतिक पर्यटन स्थळ म्हणून विकसित करा : राधाकृष्ण विखे पाटील

## सर्वसमावेशक पर्यटन विकास आराखडा सादर करण्याचे निर्देश

**शिर्डी : हॅलो प्रभात**

उत्तर नगर जिल्ह्याची जीवनदायिनी असलेल्या भंडारदरा धरणाचे हे शताब्दी वर्ष केवळ उत्सवापुरते मर्यादित न राहता, या निमित्ताने हे धरण शाश्वत व जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ म्हणून विकसित झाले पाहिजे. यासाठी जुन्या वास्तूंचे जतन, वॉटर टुरिझम व स्थानिकांना रोजगार देणारा सर्वसमावेशक पर्यटन विकास आराखडा त्वरित सादर करण्याचे निर्देश राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

भंडारदरा धरणाच्या शताब्दी वर्षानिमित्त करावयाच्या उपाययोजना व पर्यटन विकास आराखड्याचा आढावा घेण्यासाठी निळवंडे धरण विश्रामगृहात आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस आमदार अमोल खताळ, माजी आमदार वैभव पिचड, जिल्हा बँकेचे संचालक अमित भांगरे, माजी सभापती मारुती मेंगाळ, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार, मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ,




अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, कार्यकारी अभियंता स्वप्निल काळे व सोनल शहाणे आदी उपस्थित होते. पालकमंत्री विखे पाटील म्हणाले, २०२६ पासून धरणाचे १०० वे वर्ष सुरू होत आहे. त्यादृष्टीने 'डॅम रिहॅबिलिटेशन इम्प्रुव्हमेंट प्रोजेक्ट' (DRIP) अंतर्गत निधी व राज्य शासनाचा विशेष निधी वापरून कामे केली जातील. या महोत्सवाच्या नियोजनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

जलसंपदा विभाग, वन विभाग व एमटीडीसी यांनी समन्वय साधून १५ दिवसांत अंतिम 'मास्टर प्लॅन' तयार करावा. रिसॉर्ट्सच्या माध्यमातून स्थानिकांना संधी उपलब्ध करून देण्याचे धोरण असल्याचे श्री.विखे पाटील यांनी स्पष्ट केले.